संगणक संकेतांक २०१२२०१११४३६४०५७२५

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १८] मंगळवार, ऑगस्ट १४, २०१२/श्रावण २३, शके १९३४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक २९

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.—** मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. .. .. | १—३ |

दिनांक ८ ऑगस्ट २०१२ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,<br>
सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक १४ ऑगस्ट २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

## मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम

१८८८ **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये
चा आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी,
मुंबई ३. याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०११ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ९२ ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९२ मधील, खंड (डडड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल आणि तो, २२ जून १९९३ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :- (१८८८ चा मुंबई ३.)

"(डडडड) महानगरपालिकेने कोणत्याही मुदतीसाठी दिलेले महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचे सर्व भाडेपट्टे हे, महानगरपालिकेने निष्पादित केलेल्या भाडेपट्टा विलेखामध्ये किंवा भाडेपट्टा करारामध्ये घालून दिलेल्या शर्तींबरोबरच, पुढील शर्तींच्या अधीन असतील :—

(एक) महानगरपालिकेच्या मालकीच्या आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांच्या संबंधातील पट्टेदारी हक्क हे, केवळ आयुक्ताच्या पूर्वपरवानगीने, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने अनर्जित उत्पन्नापोटी असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार यांचे प्रदान केल्यावर आणखी अभिहस्तांकित किंवा हस्तांतरित करता येतील.

(दोन) उप-खंड (एक) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास, अशा पट्टेदारी हक्कांचा पट्टेदार किंवा हस्तांतरक हा, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दरांनी असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार यांबरोबरच शास्तीदेखील प्रदान करण्यास पात्र असेल.".

विधिग्राह्यीकरण.

३. मुख्य अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम, उप-विधी किंवा विनियम यांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेने, दिनांक २२ जून १९९३ रोजी सुरु होणाऱ्या आणि मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०११ याच्या प्रारंभाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत, आयुक्ताच्या पूर्वपरवानगीने किंवा पूर्वपरवानगीशिवाय, महानगरपालिकेच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांच्या संबंधातील पट्टेदारी हक्कांच्या पट्टेदाराने किंवा हस्तांतरकाने अशा पट्टेदारी हक्कांच्या आणखी अभिहस्तांकनावर किंवा हस्तांतरणावर अनर्जित उत्पन्नापोटी असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांची महानगरपालिकेने केलेली कोणतीही आकारणी, मागणी व वसुली आणि त्याबद्दल महानगरपालिकेने केलेली कोणतीही कारवाई ही, मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०११ द्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये वैधरीतीने केलेली आकारणी, मागणी, वसुली असल्याचे किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल आणि ती नेहमीच वैधरीतीने केलेली आकारणी, मागणी, वसुली असल्याचे किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल; आणि त्यानुसार, महानगरपालिकेने असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांची आकारणी, मागणी, वसुली किंवा करावयाची कारवाई यांबद्दल, अशा प्रारंभापूर्वी, मुख्य अधिनियमामध्ये तरतुदी

(२०१२ चा महा. २०.) (२०१२ चा महा. २०.)

करण्यात आल्या नव्हत्या या कारणावरून, कोणत्याही न्यायालयांत किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा अन्य प्राधिकरणापुढे कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. दिनांक २२ जून १९९३ पासून अशा रीतीने आकारणी, मागणी आणि वसूल केलेले असे कोणतेही अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार किंवा शास्ती यांचा परतावा करण्यासाठी किंवा केलेल्या कोणत्याही कारवाईसाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा अन्य प्राधिकरणापुढे कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालवण्यात येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.